Entering Online marks for ME Dessertation

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

("पूर्वीचे पुणे विद्यापीठ")

फोन ०२०-२५६०१२१९
फॅक्स ०२० २५६०१२०६
website : www.unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे -४११००७
email : st-engineering@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/अभि/ ७७८

दि. १५.०९.२०१५

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये

विषय : अभियांत्रिकी विद्याशाखेंतर्गत असलेल्या पदव्युत्तर परीक्षेचे लघुशोध निबंधाचे गुण ऑनलाईन पध्दतीने पाठविणेबाबत.

महोदय,

अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर परीक्षेचे प्रथम, द्वितीय व तृतीय सत्र परीक्षेचे निकाल प्रचलित पध्दतीने जाहीर करण्यात येतात तर चतुर्थ सत्रासाठी फक्त लघुशोध निबंध असल्याने विद्यार्थी महाविद्यालयामार्फत विद्यापीठ कार्यालयाकडे लघुशोध निबंध सादर करतात आणि त्यानंतर जसजशा मौखिक परीक्षा (Viva) होतील तसतसे निकाल जाहीर केले जात होते.

लघुशोध निबंध सादर झाल्यानंतर बहि:स्थ परीक्षक नेमणूक करण्याकरिता संबंधित विषयाच्या अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांकडे नावे पाठविण्यात येवून त्यानंतर मा. अधिष्ठाता यांची अंतिम मान्यता घेण्यात येते. मा. अधिष्ठाता यांच्या मान्यतेनंतर परीक्षकांची नावे संबंधित महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतात. संबंधित महाविद्यालये अंतर्गत व बहि:स्थ परीक्षक यांच्या सोयीनुसार विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा (Viva) आयोजित करतात. त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याचे गुण सीलबंद पाकीटात ऑफलाईन पध्दतीने सादर केले जात होते.

विद्यापीठ अधिकार मंडळाने मौखिक परीक्षांचे व त्यानंतर गुण ठराविक वेळेत सादर करण्याबाबत खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून त्यानुसार यापुढे मौखिक परीक्षा घेण्यात याव्यात. त्याचप्रमाणे गुण ऑनलाईन पध्दतीने ठराविक वेळेत पाठविण्यात यावेत.

| लघुशोध निबंध परीक्षकांच्या यादयासहीत सादर करण्याचा कालावधी | | परीक्षकांच्या यादया मान्यता घेवून महाविद्यालयास देणे | महाविद्यालयामार्फत Viva घेणे आणि गुण पाठविणे | निकाल जाहीर करणे |
|---|---|---|---|---|
| विनाविलंब शुल्क | विलंब शुल्कासहीत | | | |
| जून अखेर | जुलै अखेर | ऑगस्ट | सप्टेंबर/ऑक्टोबर | नोव्हेंबरअखेर |
| नोव्हेंबर अखेर | डिसेंबर अखेर | जानेवारी | फेब्रुवारी/मार्च | एप्रिलअखेर |

31 Jan. 20 Feb.

कळावे.

आपला

परीक्षा नियंत्रक

Scanned by CamScanner